MAHARASHTRA TOURISM

## महाराष्ट्र


# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

फेब्रुवारी २०२६ / अंक २



तापोळा



भंडारदरा



माथेरान

# महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

सन 2026 ची सुरुवात महाराष्ट्रातील पर्यटनासाठी अत्यंत उत्साहवर्धक ठरली आणि फेब्रुवारी महिन्यातही त्या सकारात्मकतेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आला. नववर्षाच्या सुट्ट्यांमुळे सुरु राहिलेली पर्यटनाची लाट, आल्हाददायक हवामान आणि विविध सांस्कृतिक आकर्षणांमुळे राज्यातील सर्व पर्यटनस्थळे उत्साहाने गजबजलेली व चैतन्यमय राहिली.

# ‘ओटीएम 2026’च्या तीन दिवसीय प्रदर्शनात महाराष्ट्र पर्यटनाच्या दालनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

आशियातील सर्वात मोठ्या पर्यटन व्यापार प्रदर्शनांपैकी एक असलेला ‘आउटबाउंड ट्रॅव्हल मार्ट (OTM) 2026’ हा कार्यक्रम मुंबईतील वांद्रे येथील जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित करण्यात आला. जागतिक स्तरावर पर्यटनाला चालना देण्यासाठी हे तीन दिवसीय प्रदर्शन दरवर्षी मुंबईमध्ये भरविण्यात येते. या पर्यटन व्यापार प्रदर्शनाला पर्यटन क्षेत्रातील विविध घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात महाराष्ट्र पर्यटन दालनात 40 हून अधिक पर्यटन भागधारकांनी सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमामध्ये मा.श्री. संजय खंदारे, (भा.प्र.से.) प्रधान सचिव, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन, डॉ. बी.एन.पाटील (भा.प्र.से) संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन, मा.श्री. निलेश गटणे, (भा.प्र.से) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन, मा.श्री. चंद्रशेखर जयस्वाल, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी महाराष्ट्र पर्यटनच्या दालनाला भेट देऊन सहभागी प्रदर्शकांशी संवाद साधला.



कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी महाराष्ट्र पर्यटनच्या दालनाला भेट देऊन सहभागी प्रदर्शकांशी संवाद साधला. तसेच OTM 2026 दरम्यान महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळांची सविस्तर माहितीही पर्यटकांना देण्यात आली. या निमित्ताने पर्यटन विभागाने विशेष दालन उभारले होते. या दालनाच्या माध्यमातून अभ्यागतांना राज्यातील विविध पर्यटन विभाग, पर्यटनस्थळांपर्यंत पोहोचण्याचे मार्ग, उपलब्ध सुविधा आणि सेवा यांची माहिती देण्यात आली.

# नवी दिल्लीतील ‘SATTE 2026’च्या माध्यमातून महाराष्ट्र पर्यटन वैभवाचे भव्य दर्शन

दक्षिण आशियातील अग्रगण्य बी2बी प्रवास व पर्यटन प्रदर्शन SATTE 2026 (South Asia's Travel & Tourism Exchange) च्या 32व्या आवृत्तीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने सहभाग घेऊन विशेष दालन उभारले. नवी दिल्ली येथील यशोभूमी, इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अँड एक्स्पो सेंटर, द्वारका येथे 25 ते 27 फेब्रुवारी 2026 दरम्यान या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या दालनाने देश-विदेशांतील पर्यटक व व्यावसायिकांचे लक्ष वेधून घेतले.

श्री. संतोष जाधव, सहसंचालक, पर्यटन संचालनालय, श्री. चंद्रशेखर जयस्वाल, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व श्री. विजय जाधव, उपसंचालक पर्यटन संचालनालय यांनी या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्र पर्यटन विभागाचे नेतृत्त्व केले.



या तीन दिवसीय प्रदर्शनामध्ये उभारण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या दालनाचे उद्घाटन पर्यटन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांद्वारे करण्यात आले. इनफॉर्मा मार्केट्सद्वारे आयोजित प्रदर्शनामध्ये 50 हून अधिक देश व 28 राज्यांतील पर्यटन मंडळांनी सहभाग घेतला होता, ज्यामुळे व्यवसायवृद्धी आणि पर्यटनस्थळांच्या प्रचारासाठी एक मजबूत व्यासपीठ उपलब्ध झाले.

## ‘महाराष्ट्र पर्यटन परिचय सहल 2026’ यशस्वीरित्या संपन्न



‘महाराष्ट्र पर्यटन परिचय सहल 2026 (FAM Tour)’ अंतर्गत, राज्यातील पर्यटनाच्या विस्तीर्ण संधींचे दर्शन घडवणारे तीन विशेष प्रवास आराखडा (Itineraries) तयार करण्यात आले होते. 15 ते 19 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात सहभागींना महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळे, टूर सर्किट (Circuits) आणि स्थानिक आदरातिथ्य व्यवस्थेचा सर्वसमावेशक अनुभव घेता आला. कोकण विभागाच्या पर्यटन उपसंचालिका प्रज्ञा मनोहर यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या दौऱ्यात माध्यम प्रतिनिधी, टूर ऑपरेटर्स आणि आशय निर्मात्यांसह एकूण 94 मान्यवर सहभागी झाले होते.

देशांतर्गत प्रतिनिधींच्या यशस्वी परिचय सहलीनंतर दि. 27 फेब्रुवारी ते 4 मार्च 2026 या कालावधीत आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसाठी ही सहल उत्साहात पार पडली. राज्यातील पर्यटन स्थळांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन महाराष्ट्राची सकारात्मक प्रतिमा परदेशी बाजारपेठांमध्ये अधिक बळकट करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या सहलीत पर्यटन विभागाचे छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपसंचालक श्री. विजय जाधव, नाशिक विभागाचे उपसंचालक श्री. नंदकुमार राऊत आणि नागपूर विभागाचे उपसंचालक श्री. प्रशांत सवाई सहभागी झाले होते. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मिळून माध्यम प्रतिनिधी, टूर ऑपरेटर्स, कंटेन्ट क्रिएटर व पर्यटन क्षेत्रातील महत्त्वाचे भागधारक अशा एकूण 65 प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

## किल्ले शिवनेरी येथे ‘हिंदवी स्वराज्य महोत्सव 2026’ला अभूतपूर्व प्रतिसाद; तीन दिवसांत हजारो पर्यटकांची उपस्थिती

पर्यटन विभाग व पुणे जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी आयोजित करण्यात आलेल्या ‘श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव : हिंदवी स्वराज्य महोत्सव 2026’ला तीनही दिवस नागरिक, शिवभक्त आणि पर्यटकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. 17 ते 19 फेब्रुवारी 2026 दरम्यान पार पडलेल्या या महोत्सवाने ग्रामीण पर्यटनाला नवे बळ मिळाल्याचे स्पष्ट झाले.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसापासूनच परिसरात उत्साहाचे वातावरण होते. महिला बचत गटांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या विशेष व्यासपीठामुळे त्यांच्या खाद्यपदार्थ व हस्तकला दालनाला मोठा प्रतिसाद मिळाला. तसेच स्थानिक उत्पादने आणि पारंपरिक कलावस्तूंना पर्यटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली.



# आगामी कार्यक्रम

## साताऱ्यातील पाटण येथे 2 ते 6 एप्रिलदरम्यान ‘कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026’





महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभाग, जिल्हा प्रशासन सातारा आणि विभागीय पर्यटन संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाटण, जि. सातारा येथे दि. 2 ते 6 एप्रिल 2026 या कालावधीत ‘कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026’चे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या सातारा जिल्ह्यातील निसर्गसंपन्न पर्यटन स्थळांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर अधिक ठळक स्थान मिळावे, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. ‘कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026’मुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. या महोत्सवात नागरिक, शेतकरी, पर्यटक आणि उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# महत्त्वाच्या बातम्या

## नळदुर्ग किल्ला : जतन संवर्धनासाठी 10.38 कोटींचा निधी मंजूर; पर्यटनाला मिळणार चालना

राज्यातील सर्वांत मोठा भुईकोट किल्ला अशी ओळख असलेला आणि स्थापत्यशास्त्राच्या उत्तम नमुन्यांपैकी समजल्या जाणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने 10 कोटी 38 लाख 45 हजार 437 रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे किल्ल्याचे निर्मिते बहमनी वंशातील वजीर महमूद गवान यांची समाधी परिसर आणि किल्ल्याची वास्तूशैली यांचा समावेश असलेल्या एकूण 14.38 कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली होती. पर्यटन विकासासाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे विकासकामांना आता गती मिळणार आहे.



धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा किल्ला आहे. किल्ल्याच्या विकासासाठी कल्याणच्या चावडी आणि मुख्य प्रवेशद्वार दुरुस्ती करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक विभागाने 2 कोटी 87 लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यानुसार संपूर्ण विकासकामांसाठी 10 कोटी 38 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. भविष्यात किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित केला जाणार आहे.

## 75 नमो पर्यटन केंद्र, माहिती सुविधा केंद्रास मान्यता

राज्यातील 75 पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी आधुनिक मूलभूत सोयी-सुविधायुक्त 'नमो पर्यटन केंद्र' व माहिती सुविधा केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावावर मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृहात सोमवारी आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते.




पहिल्या टप्प्यातील प्रसादगड, त्रिवेणी, साल्हेर व रायगड येथे पर्यटन केंद्र उभारण्यासाठी 5000 पर्यटन कौशल्य प्रशिक्षणार्थींपैकी प्रथम 1500 व उर्वरित 3500 प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

## अर्थसंकल्पात पर्यटन विकासाला चालना : शंभूराज देसाई



देशाच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने चालू अर्थसंकल्पात आकर्षक योजनांची आखणी, पर्यटन निधी, सवलतींसह आर्थिक सुधारणा करणार असल्याचे, अशी माहिती मा. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

'सेल्फ ड्राइव्ह फॉर हेल्थ' मोहिमेअंतर्गत अनेक हॉस्पिटल्स आणि वेलनेस केंद्रांचा समावेश करण्यात येणार आहे. 20 पर्यटन कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत 32 अब्जावधी प्रशिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. देशातील महत्त्वाचे 45 पर्यटन स्थळे विकसित करून जागतिक पर्यटन, धार्मिक-सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून उभारण्यात येणार आहे. संबंधित संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर सेवा शुल्क व इतर अनेक कर सवलती देण्यात येणार आहेत.


## परदेशी पर्यटकांची महाराष्ट्राला पहिली पसंती

'भारतातील पर्यटन क्षेत्रासाठी महाराष्ट्र हे सर्वाधिक पसंतीचे राज्य ठरत असून, गेल्या तीन वर्षांत राज्यात येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. सन 2023 मध्ये महाराष्ट्रात 15 लाख, 12 हजार परदेशी पर्यटकांनी भेट दिली होती. हा आकडा 2024 मध्ये वाढून 37 लाख, 65 हजारांपर्यंत पोहोचला आहे,' अशी माहिती केंद्रीय पर्यटन आणि मा. संस्कृतीमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी राज्यसभा प्रश्नोत्तराच्या एका लेखी उत्तरात दिली.

केंद्रीय पर्यटन आणि संस्कृती मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील परदेशी पर्यटकांची ही संख्या सातत्याने वाढत आहे. 2022 मध्ये 15 लाख, 12 हजार असलेली ही संख्या 2023 मध्ये 33 लाख, 58 हजारांवर गेली आणि 2024 मध्ये ती 37 लाख, 5 हजार इतका नोंदवला गेला. विशेष म्हणजे, 2024 मध्ये महाराष्ट्रातील एकूण परदेशी पर्यटकांपैकी 19.61 टक्के पर्यटकांनी महाराष्ट्राला पसंती दिली असून, पर्यटनाच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचे स्थान सर्वाधिक राहिले आहे.



## कातळशिल्पांच्या संशोधनासाठी 'वर्ल्ड हेरिटेज डेस्क'


Image for representation purpose

कोकण किनारपट्टी आणि पठारावर आढळून आलेल्या हजारो वर्षे जुन्या कातळशिल्पांचा (जिओग्लिफ्स) संशोधन, दस्तऐवजीकरण आणि संवर्धनासाठी राज्य सरकारने 'वर्ल्ड हेरिटेज डेस्क' स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी एकूण 14 कोटी 62 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, हा डेस्क सन 2026 ते 2029 या कालावधीत कार्यरत राहणार आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने गुरुवारी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला.

कोकणातील कातळशिल्पे ही आद्य ऐतिहासिक मानवसंस्कृतीचा अमूल्य वारसा मानली जातात. या शिल्पांमध्ये हजारो वर्षांपूर्वीच्या मानवजीवन, सांस्कृतिक परंपरा आणि पर्यावरणीय संदर्भांचा अभ्यास करता येतो. या पार्श्वभूमीवर कातळशिल्पांच्या सखोल अभ्यासासाठी आणि 'युनेस्को' नामांकन प्रक्रियेसाठी गती देण्यासाठी स्वतंत्र डेस्क स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# उन्हाळ्यात अनुभवा गारवा...

## तापोळा

महाबळेश्वरच्या कुशीत वसलेले तापोळा हे निसर्गाच्या शांत लयीशी एकरूप होण्यासाठी आमंत्रण देणारे रमणीय ठिकाण आहे. येथील पर्यटनाचा मुख्य आधार म्हणजे शिवसागर जलाशयाचा विस्तीर्ण जलप्रदेश. सह्याद्रीच्या हिरव्यागार डोंगररांगांनी वेढलेला हा परिसर सकाळच्या धुक्यात आणि संध्याकाळच्या मृदू प्रकाशात विशेष मोहक भासतो. बोटींग, कायकिंग यांसारख्या जलक्रीडा अनुभवताना अथवा जलाशयाच्या शांत किनाऱ्यावर बसून पाण्यावर उमटणाऱ्या प्रकाशछटा न्याहाळताना पर्यटकाला निसर्गाच्या शांततेचा गहिरा स्पर्श जाणवतो. म्हणूनच तापोळ्याला अनेकदा 'मिनी काश्मीर' असेही संबोधले जाते.



## भंडारदरा



सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये निसर्गाने मुक्तहस्ते सौंदर्य उधळलेले ठिकाण म्हणजे भंडारदरा. येथे असलेले आर्थर लेक आणि त्याला आधार देणारे विल्सन धरण हे या प्रदेशाचे प्रमुख आकर्षण आहे. सभोवताली पसरलेल्या वनाच्छादित टेकड्या, धुक्याने वेढलेले आकाश आणि शांत जलाशय यांचा संगम इतका मोहक आहे की हा परिसर जणू चिंतन, विश्रांती आणि निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठीच घडवला गेला आहे असे वाटते. पावसाळ्यात धबधब्यांनी नटलेला आणि हिवाळ्यात स्वच्छ निळ्या आकाशाखाली उजळून निघणारा भंडारदरा प्रत्येक ऋतूत वेगळी मोहिनी घालतो.

## माथेरान

सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांवर वसलेले माथेरान हे महाराष्ट्रातील सर्वात नयनरम्य थंडहवेच्या ठिकाणांपैकी एक मानले जाते. मुंबई आणि पुणे या गजबजलेल्या शहरांच्या जवळ असूनही, येथे वाहनांना प्रवेश नसल्यामुळे या ठिकाणची शुद्ध हवा आणि शांत, प्रसन्न वातावरण आजही अबाधित राहिले आहे. पॅनोरामा पॉइंटवरून दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य आणि ऐतिहासिक माथेरान हिल रेल्वेचा रंजक प्रवास पर्यटकांना एक वेगळाच आनंद देतो. उन्हाळ्याच्या कडक उष्णतेतही येथे मिळणारी गारवा आणि निसर्गाची सान्निध्यता मनाला नवचैतन्य देणारी ठरते.



## आंबोली



सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेले आंबोली हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक मोहक थंडहवेच्या ठिकाण असून, आल्हाददायक हवामान, दाट वनराई आणि दऱ्याखोऱ्यांचे मनोहारी दृश्य यांसाठी प्रसिद्ध आहे. आंबोली धबधबा आणि सनसेट पॉइंट यांसारखी रमणीय ठिकाणे येथे निसर्गसौंदर्याची अद्भुत मेजवानी देतात. उन्हाळ्याच्या तीव्र उकाड्यातही येथे हवामान प्रसन्न आणि थंडगार राहते. धुक्याच्या हलक्या पडद्याने वेढलेले डोंगर आणि शांत निसर्ग वातावरण पर्यटकांसाठी खऱ्या अर्थाने एक शांत, निवांत आणि अविस्मरणीय सहल ठरवतात.

MAHARASHTRA

www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org

**Follow us on:**

MaharashtraTourism

diot@maharashtratourism.gov.in

@maha_tourism

maharashtratourismofficial